# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 29/07/2021 (गुरूवार)

(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावरील जयभोलेनगर चनकापुर सप्तश्रृंगी कॉम्पलेक्स येथे दिनांक 22/07/2021 ते दिनांक 23/07/2021 ते 06.00 वा. दरम्यान विनोदराम वकीलराम पासी, वय 47 वर्ष, रा. जयभोले नगर, चनकापूर याचे वाइंडींग दुकान मधील दुरुस्ती करीता आलेले सामान 1. एच पी मोटर चे चार स्टॉर्टर किंमती 2,000/–रु., 2. वेल्डींग मशीन कॉइल 3 नग किमती 4,500/–रु., 3. ड्रील मशीन 1 नग किमती 1,000/–रु. 4. ग्राइंडर मशीन 1 नग किमती 500/–रु. व 5. चक्की सह तांबा वायर 06 किलो किमती 2,500/–रु., 6. वेल्डींग मशीन रेगुलेटर 1 नग किमती 2,500/–रु. असा एकुण कि. 13,000/–रु. चा माल अज्ञात आरोपीने दुकानाचा शटर ताला तोळून दुकानाचा आत प्रवेश करुन चोरी केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुर्यभान जळते मो. क्र. 9673837007 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 0.5 कि.मी अंतरावरील नगर परिषद कार्यालय काटोल येथे दिनांक 27/07/2021 चे 11.00 वा. ते 14.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रदिप वामनराव येकूलकर, वय 48 वर्ष, रा. गडपूरा काटोल यांनी त्यांची एमएच– 40/एपी– 2230 क्रमांकाच्या हिरो होन्डा स्पेलंडर मोटरसायकल ही नगर परिषद कार्यालयाचे समोर खूल्या जागेत उभी करून ठेवली व नगर परिषद मध्ये काम करायला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 15,000/–रू. मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक श्री संतोष आंधळे मो. नं 83808 33424 हे करीत आहे.

3) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 3 कि.मी अंतरावरील मौजा रामटेक येथे दिनांक 26/07/2021 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हिरामन श्रीराम हींगे, वय 45 वर्षे, रा. मानापुर यांचा टाटा 10 चक्का ट्रक खाली प्लॉटवर उभा असता अज्ञात आरोपीने आउटोबॅट कंपनीचे तसेच एक्ससाईट डीवाय नेट कंपनीचे एकुण 2 बॅटरी कि. 15,000/–रू. तसेच ट्रैक्टर बॅटरी कि. 5,000/–रू. असा एकुण कि. 20,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मनोहर राउत मो. क्र. 9423628307 हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत 14 कि. मी. अंतरावरील बेलडोंगरी येथे दिनांक 23/07/2021 चे 23.30 वा. ते 23.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे— आशिष अशोक शेंडे, वय 25 वर्ष, रा. बेलडोंगरी ता. रामटेक यांचे वडील नामे— अरून चेपा मेश्राम, वय 63 वर्ष, रा. बेलडोंगरी ता. रामटेक हे आपले घरीच बडबड करून शिवीगाळ करीत असता त्यांचा भाच्याचा फोन आल्याने ते घराचे समोर रोडवर जोराजोराने बोलत असतांना आरोपी नामे— नरेंद्र पंजाबराव शेंडे, रा. बेलडोंगरी हा तेथे आला व ''मला कशाला शिवीगाळ करीत आहे'' असे म्हणत होता. तेव्हा फिर्यादीचे वडीलांनी त्यास ''मी तुला शिवीगाळ करीत नाही आहे'' असे म्हटले तर आरोपीने त्यांचे सोबत झंगडा भांडण करून शिवीगाळ केली व काठीने उजव्या पायावर मारून पाय फ्रॅक्चर करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक उके बांद्रे 9881241089 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर